आकाशवाणी मुंबई

राष्ट्रीय  बातमीपत्र - दुपारी १.३० वाजता

११ नोव्हेंबर २०२४ - सोमवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज असल्याचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर याचं प्रतिपादन

- देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी घेतली शपथ

- विधानसभा निवडणुकीत पक्षविरोधी कारवाई केल्याबद्दल काँग्रेसकडून बावीस पदाधिकाऱ्यांचं सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबन

- झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्याच्या मतदानासाठी आज संध्याकाळी प्रचार थांबणार

**आणि**

- भारताच्या अनाहत सिंगनं पटकावलं स्क्वॉश एनएसडब्ल्यू ओपन २०२४ स्पर्धेचं विजेतेपद

**<><><><><>**

भारत आणि रशियानं व्यापारी संबंध आणखी दृढ करण्याची गरज परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांनी आज व्यक्त केली. मुंबईत भारत - रशिया व्यावसायिक परिषदेला ते संबोधित करत होते. रशियाचे प्रथम उप प्रधानमंत्री डेनिस मान्टुरोव्ह यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते. दोन्ही देशांमधला व्यापार सध्या ६६ अब्ज अमेरिकन डॉलर आहे. २०३० पर्यंत हा व्यापार १०० अब्ज डॉलरच्या पलीकडे जाईल, असा विश्वास त्यांनी यावेळी व्यक्त केला. दळणवळण, बँकिंग आणि आर्थिक देवाण-घेवाणीच्या संदर्भातले अडथळे दूर करण्यासाठी दोन्ही देशांकडून

प्रयत्न सुरू आहेत. लवकरच दोन्ही बाजूंना मान्य असलेला तोडगा निघेल, अशी आशा त्यांनी व्यक्त केली.

**<><><><><>**

भारतीय तरुणांच्या क्षमतेकडे संपूर्ण जगाचं लक्ष असून जागतिक नेत्यांना भारतीय तरुणांनी त्यांच्या देशात काम करण्याची अपेक्षा असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. गुजरातमधे वडताल इथं श्री स्वामीनारायण मंदिराच्या २००व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमाला त्यांनी आज सकाळी दूरदृश्य माध्यमाद्वारे संबोधित केलं. कुशल मनुष्यबळ असलेल्या भारतीय तरुणांची जागतिक मागणी आणखी वाढणार असून विकसित भारतासाठी तरुणांना सशक्त केलं पाहिजे, असं त्यांनी यावेळी म्हटलं. यावेळी सरकारनं २०० रुपयांचं चांदीचं नाणं आणि टपाल तिकीट जारी केल्याबद्दल त्यांनी आनंद व्यक्त केला. शिक्षण, कौशल्य विकास, व्यसनमुक्ती आणि आधुनिकतेशी अध्यात्माची सांगड घालून नवीन पिढी घडवणं यासारख्या विविध क्षेत्रात स्वामीनारायण संस्थेच्या योगदानाचंही त्यांनी यावेळी कौतुक केलं.

**<><><><><>**

देशाचे ५१ वे सरन्यायाधीश म्हणून न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी आज पदभार स्वीकारला. राष्ट्रपती भवनात झालेल्या समारंभात राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी खन्ना यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. या सोहळ्याला उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, अनेक केंद्रीय मंत्री आणि सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश उपस्थित होते.

न्यायमूर्ती संजीव खन्ना यांनी १९८३ मध्ये वकिलीची सुरुवात केली. त्यांनी जानेवारी २०१९ पासून सर्वोच्च न्यायालयाचे न्यायाधीश म्हणून काम केलं आहे. २००५ मध्ये दिल्ली उच्च न्यायालयाचे अतिरिक्त न्यायाधीश म्हणून त्यांची नियुक्ती करण्यात आली. निवडणूक बाँड योजना रद्द करणे, कलम ३७० रद्द करणे यांसारखे अनेक ऐतिहासिक निर्णय घेण्यात त्यांचा सहभाग होता.

**<><><><>**

विधानसभा निवडणुकीत पक्षाच्या अधिकृत उमेदवाराविरुद्ध बंडखोरी करत उमेदवारी दाखल केल्याबद्दल तसंच पक्षविरोधी कारवाई केल्याबद्दल काँग्रेसने बावीस पदाधिकाऱ्यांना सहा वर्षांसाठी पक्षातून निलंबित केलं आहे. ही कारवाई प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांच्या आदेशावरून केल्याची माहिती काँग्रेसचे प्रशासन आणि संघटन उपाध्यक्ष नाना गावंडे यांनी दिली. कारवाई केलेल्या पदाधिकाऱ्यात आनंदराव गेडाम, शिलु चिमुरकर, सोनल को◌ेवे, भरत येरमे, अभिलाषा गावतुरे, राजु झोडे, प्रेमसागर गणवीर, विलास पाटील, अजय लांजेवार, आसमा चिखलेकर, याज्ञवल्क्य जिचकार, शामकांत सनेर, राजेंद्र ठाकुर, आबा बागुल  आदींचा समावेश आहे.

**<><><><>**

केंद्रीय मंत्री आणि भाजप नेते नितीन गडकरी आज नागपुरात ४ प्रचारसभा घेणार आहेत तर उपमुख्यमंत्री आणि भाजप नेते देवेंद्र फडणवीस नागपूर, गोंदिया आणि मुंबईत प्रचार करणार आहेत. शिवसेनेचे मुख्य नेते, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे आज जालना इथं प्रचारसभा घेणार आहेत. महायुतीचे उमेदवार अर्जुन खोतकर यांच्या प्रचारासाठी ते आज सभा घेणार आहेत. उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी

काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार नंदुरबार, नांदेड आणि अमरावतीमध्ये प्रचार करणार आहेत तर राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार धुळे आणि जळगाव या मतदारसंघात प्रचार करणार आहेत. काल शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी सोलापुरात तर आदित्य ठाकरे यांनी भाईंदरमध्ये प्रचार केला.

**<><><><>**

जाती-धर्माच्या प्रचाराला न भुलता विकासाचं राजकारण करणाऱ्यांना मत द्या असं आवाहन भाजपा नेते, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलं. ते काल नागपूर दक्षिण मतदारसंघात महायुतीच्या प्रचारसभेत बोलत होते. महायुती सत्तेत आल्यावर मुलींच्या शिक्षणाचा पूर्ण खर्च सरकार करेल, असं आश्वासन यावेळी त्यांनी दिलं. वैद्यकीय महाविद्यालय, सर्कुलर बस, झोपडपट्टी पुनर्वसन करून महायुती सरकारनं विकास केल्याचं फडणवीस म्हणाले.

**<><><><>**

श्रोते हो, विधानसभा निवडणुकीच्या निमित्तानं ‘आढावा विधानसभा मतदारसंघांचा’ हा कार्यक्रम दररोज संध्याकाळी ७ वाजून १० मिनिटांनी अस्मिता वाहिनीसह प्रादेशिक वृत्त विभागाच्या Youtube वरुन प्रसारित केला जात आहे. या कार्यक्रमात आज **पुणे** जिल्ह्यातल्या मतदारसंघांचा आढावा आपल्याला ऐकता येईल.

**<><><><>**

झारखंड विधानसभेच्या पहिल्या टप्प्यात १३ नोव्हेंबर रोजी ४३ जागांसाठी मतदान होणार आहे. त्यासाठी आज संध्याकाळी प्रचार थांबणार आहे. भाजपाचे

ज्येष्ठ नेते प्रधानमंत्री नरेंद्र मोदी दुपारी १२ वाजता पक्ष कार्यकर्त्यांशी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून संवाद साधणार आहे. राष्ट्रीय लोकशाही आघाडी आणि इंडिया आघाडी यांनी जोरदार प्रचार केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

वायनाड लोकसभा पोटनिवडणुकीसाठीही आज प्रचार थांबणार आहे. युनायटेड डेमोक्रेटिक फ्रंटकडून काँग्रेस उमेदवार प्रियांका गांधी निवडणूक लढवत आहेत, तर भाजपकडून नव्या हरिदास आणि लेफ्ट डेमोक्रेटीक फ्रंटचे उमेदवार सत्यन मोकेरी यांच्यात तिरंगी लढत आहे.

आसाममध्येही विधानसभेच्या ५ जागांसाठीच्या पोटनिवडणुकीचा प्रचार आज संध्याकाळी संपणार आहे. एकूण ३४ उमेदवार रिंगणात आहेत. भाजपनं विधानसभेच्या ३ जागांवर तर आसाम गण परिषद आणि यूपीपीएलनं प्रत्येकी एका जागेवर उमेदवार उभे केले आहेत. काँग्रेस पाचही जागा लढवत आहे.

**<><><><><>**

झारखंड भाजपनं आपल्या समाज माध्यमावर केलेल्या जाहिराती विरोधात काँग्रेसनं निवडणूक आयोगाकडे तक्रार केली आहे. ही जाहिरात दिशाभूल करणारी असल्याचा आरोप पक्षाचे सरचिटणीस जयराम रमेश यांनी आयोगाला लिहिलेल्या पत्रात केला आहे. हे आदर्श आचारसंहितेचे उल्लंघन असून भाजपनं विरोधी पक्षनेत्याला चुकीच्या पद्धतीनं दाखवलं असल्याचं त्यांनी म्हटलं आहे. निवडणूक आयोगानं ही जाहिरात काढून टाकून भाजपवर कारवाई करावी अशी मागणी त्यांनी केली आहे.

**<><><><><>**

अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प आणि रशियाचे अध्यक्ष व्लादिमीर पुतीन यांनी नुकतीच दूरध्वनीवरुन चर्चा केली. युक्रेन विरुद्धच्या युद्धात आणखी आक्रमकता नको, असा सल्ला ट्रम्प यांनी पुतीन यांना दिला. या मुद्द्यावर रशियासोबत आणखी चर्चा करण्याची तयारी ट्रम्प यांनी दाखवली. बुधवारी ट्रम्प यांनी युक्रेनचे अध्यक्ष वोल्डोमोर झेलेन्स्की यांच्याशी चर्चा केली होती.

**<><><><><>**

भारताच्या अनाहत सिंगनं सिडनी इथं सुरू असलेल्या स्क्वॉश एनएसडब्ल्यू ओपन २०२४ स्पर्धेत महिला एकेरीचे विजेतेपद पटकावलं आहे. तीचं हे वर्षातील सातवं पीएसए चॅलेंजर विजेतेपद आहे. अंतिम फेरीत सिंगनं  हाँगकाँगच्या १५ वर्षीय हेलन तांगचा ३-१ असा पराभव केला.

**<><><><><>**

महिला आशियाई हॉकी अजिंक्यपद चषक २०२४ स्पर्धेला आजपासून बिहारमधे नालंदा इथल्या राजगीर इथं सुरुवात होत आहे. बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार यांच्या हस्ते या क्रीडा स्पर्धेचं उद्घाटन होईल. या स्पर्धेत भारतासह चीन, जपान, मलेशिया, कोरिया आणि थायलंड देशांचे संघ सहभागी आहेत. या स्पर्धा दहा दिवस चालणार आहेत, असं बिहार क्रीडा प्राधिकरणाचे महासंचालक रवींद्रन शंकरन यांनी आकाशवाणीशी बोलताना सांगितलं.

**<><><><><>**

भारताचा आघाडीचा खेळाडू रोहन बोपण्णा आणि त्याचा ऑस्ट्रेलियन साथीदार मॅथ्यू एब्डेन आज रात्री इटलीत तुरिन इथं टेनिस एटीपी स्पर्धेत खेळणार आहेत. साखळी फेरीत पहिल्या लढतीत भारत-ऑस्ट्रेलियन जोडीचा सामना

इटलीच्या अँड्रिया वावासोरी आणि सिमोन बोलेली या जोडीशी आज रात्री १० वाजून २० मिनिटांनी सुरू होणार आहे. साखळी फेरीत दुसऱ्या लढतीत त्यांचा सामना उद्या एल साल्वाडोरच्या मार्सेलो अरेवालो आणि क्रोएशियाच्या मेट पाविच या जोडीशी होणार आहे. साखळी फेरीनंतर प्रत्येक गटातील अव्वल दोन खेळाडू किंवा संघ उपांत्य फेरीत प्रवेश करतील.

**<><><><><>**

दक्षिण आफ्रिकेनं काल गकेबरहा इथल्या सेंट जॉर्ज पार्क मैदानावर झालेल्या क्रिकेट सामन्यात भारताचा तीन गडी राखून पराभव केला. भारतानं केलेल्या १२५ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना दक्षिण आफ्रिकेनं १९ षटकांत ७ गडी गमावून १२८ धावा पूर्ण केल्या. ट्रिस्टन स्टब्सनं ४७ धावांवर नाबाद राहत लक्षणीय खेळी खेळली. त्याला सामनावीर घोषित करण्यात आलं. तर जेराल्ड कोएत्झीनं ९ चेंडूत १९ धावा केल्या. भारतातर्फे वरुण चक्रवर्तीनं ५ बळी घेतले. तत्पूर्वी, भारतानं निर्धारित २० षटकांत ६ बाद १२४ धावा केल्या. हार्दिक पंड्यानं सर्वाधिक ३९ धावा केल्या. अक्षर पटेलनं २७ धावा आणि तिलक वर्मानं २० धावांचं योगदान दिलं. या सामन्यातील दक्षिण आफ्रिकेच्या विजयामुळे चार सामन्यांच्या मालिकेत आता १-१ अशी बरोबरी झाली आहे. तिसरा सामना येत्या बुधवारी १३ नोव्हेंबरला सेंच्युरियनमध्ये होणार आहे.

**//<><><><><>//**